**सर्व शिक्षा अभियानांतर्गत गट / शहर साधनकेंद्रे (BRC/URC) शैक्षणिक कामकाजासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेशी संलग्न करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण ३२१४/(६२/१४)/प्रशिक्षण**

**मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.**

**तारीख: २१ ऑगस्ट, २०१४**

**प्रस्तावना :-**

शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांना सतत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता केंद्र शासनाने "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६" अन्वये शिक्षकांच्या प्रशिक्षणावर विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. त्यानुषंगाने राज्यात सध्या ३३ जिल्ह्यांमध्ये (मुंबई व उपनगरे वगळून) "जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था" (येथून पुढे DIET) कार्यरत आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून बऱ्याच ठिकाणी (DIET) इमारत बांधकामास सुरुवात झालेली आहे.

२. दिनांक २९ जानेवारी २०१४ च्या शासन निर्णयान्वये विभागाचे प्रशिक्षण धोरण जाहिर करण्यात आले असून, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डाएट) हया जिल्हास्तरावर प्रशिक्षणाची शिखर संस्था आहेत. विद्या परिषद, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या मार्फत सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत राबविण्यात येणारे शैक्षणिक गुणवत्तेशी संबंधित तसेच शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम एकत्रितरित्या DIET, BRC व URC यांच्या मार्फत संबंधित शाळा व शिक्षकांपर्यन्त पोहचविणे, प्रशिक्षणाची गुणवत्ता राखणे त्याचे मुल्यांकन करणे, प्रशिक्षणाचा उपयोग शिक्षक वर्गातील अध्ययन अध्यापनात करत असल्याची खात्री करणे यासाठी शाळा व संबंधित शिक्षकांच्या सतत संपर्कात राहून त्यांच्या शैक्षणिक समस्या व अपेक्षा समजुन घेणे. त्याप्रमाणे गरजेनूसार शैक्षणिक मार्गदर्शनासंबंधी उपाययोजना करणे. आवश्यकतेनुसार शासनाकडे प्रस्ताव सादर करणे, हया सर्व बाबींमध्ये समन्वय व सुसूत्रता आणून शासनाने निर्धारित केलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जिल्हयांतर्गत सदर यंत्रणा कार्यरत व सक्षम करुन, ती जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डाएट) यांच्या नियंत्रणाखाली आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सर्व शिक्षा अभियानांमध्ये ग्रामीण क्षेत्रात पंचायत समिती व शहरी क्षेत्रात महानगरपालिकेतंर्गत राज्यातील ४०७ गट/शहर साधन केंद्रातील २,०३१ विषय साधन व्यक्तींच्या व ८१४ समावेशित

शिक्षणांतर्गत कंत्राटी पध्दतीने कार्यरत विषय साधन व्यक्तींच्या सेवा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेशी जोडण्यात येत आहे.

२. गट/शहर साधन केंद्रातील विषय साधन व्यक्तींच्या नेमणूका हया जिल्हा/महानगरपालिका प्रकल्प समन्वयक यांच्यामार्फत करण्यात आल्या असून, संबंधित जिल्हयाच्या / महानगरपालिकेच्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकात करण्यात आलेली त्यांच्या वेतनाची तरतूद ही यापुढे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडे वर्ग करण्यात यावी. त्यासाठी डाइट संस्थेला आवश्यक निधी अग्रीम म्हणून उपलब्ध करुन देण्यात यावा.

३. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने उपलब्ध तरतुदीतून विषयसाधन व्यक्तींचे दरमहा वेतन व भत्ते महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद (MPSP) या कार्यालयाच्या परिपत्रक जा.क्र.मप्राशिप/सशिअ/BRC-URC-CRC /२०१४-१५/२५११, दिनांक २६ जून २०१४ मधील परिच्छेद क्रमांक १ व २ नुसार अदा करुन खर्चाचा अहवाल शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका यांच्याकडे प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यन्त सादर करावा.

४. सदर साधन व्यक्तींचे वेतन, रजा व प्रवास इ.ना मंजूरी देण्याचे अधिकार प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण यांना असतील.

<u>विषय साधन व्यक्तींची कार्यकक्षा -</u>

१) विषय साधन व्यक्तींनी शाळा भेटी, शैक्षणिक चर्चा सत्र, प्रशिक्षण यांना उपस्थित राहण्यासाठी शैक्षणिक कामकाजाचे मासिक नियोजन प्राचार्य, डाएट यांच्या सहमतीने व मार्गदर्शनाखाली तयार करणे. तसेच त्याबाबतची माहिती गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती व प्रशासन अधिकारी, महानगरपालिका यांना देणे.

२) विषय साधन व्यक्तींनी प्राचार्य, डाएट यांच्या सतत संपर्कात राहून जिल्हयातील गट/शहर साधन केंद्रांतर्गत शाळांना शैक्षणिक मार्गदर्शन करण्याचे कामकाज पहावे.

३) विद्या परिषद, SSA, RMSA यांच्या मार्फत राबविण्यात येणारे शैक्षणिक गुणवत्तेशी संबंधित कार्यक्रम तसेच शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम एकत्रितरित्या DIET, BRC व URC यांच्या मार्फत संबंधित शाळा व शिक्षकांपर्यन्त पोहचविणे, प्रशिक्षणाची गुणवत्ता राखणे व त्याचे मुल्यांकन करणे.

४) शाळा व संबंधित विषय शिक्षकांच्या सतत संपर्कात रहाणे. त्यांच्या शैक्षणिक समस्या व अपेक्षा समजुन घेणे. त्याप्रमाणे गरजेनुसार शैक्षणिक मार्गदर्शनासंबंधी उपाययोजना करणे. आवश्यकतेनुसार शासनाकडे विहित पध्दतीने प्रस्ताव सादर करणे.

५) विषय साधन व्यक्तींनी दरमहा केलेल्या कामकाजाचा अहवाल प्राचार्य, डाएट यांना सादर करणे.

६) प्राचार्य, डाएट यांनी विषय साधन व्यक्तींच्या वार्षिक कामकाजाबाबत दिलेल्या अभिप्रायाशी (शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने) सहमत नसल्यास, मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे त्यांना दाद मागता येईल.

<u>जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेची (DIET) भूमिका -</u>

अ) विषय साधन व्यक्ती हा विषयातील विशेष प्राविण्य प्राप्त व्यक्ती असल्याने, त्यांनी सदर विषयात जास्तीत जास्त प्राविण्य मिळविण्यासाठी व साधन व्यक्तींना अद्ययावत ठेवण्यासाठी आवश्यक असलेली मदत देणे.

आ) विषय साधन व्यक्तींना महिन्याच्या कामकाजाचे नियोजन करुन देणे. त्याप्रमाणे कामकाज होत आहे किंवा नाही याची तपासणी करणे विषय साधन व्यक्तींनी दरमहा केलेल्या कामकाजाचे मुल्यांकन करणे.

इ) विषय साधन व्यक्तींच्या विषयनिहाय क्षमता संवर्धनासाठी वेळोवेळी मार्गदर्शन करणे.

ई) विषय साधन व्यक्तींच्या सेवांचा शैक्षणिक कामकाजात प्रभावी वापर करुन घेण्यासाठी संबंतधित जिल्हयाच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक,माध्यमिक व निरंतर), जिल्हा परिषद/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका यांच्यासोबत समन्वय साधणे.

उ) विषय साधन व्यक्तींच्या कामकाजाचे वार्षिक मुल्यमापन करुन (शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने) त्यांच्या सेवेबाबत अभिप्राय देणे.

ऊ) गट/शहर साधन केंद्र आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थंच्या कामकाजाचा त्रैमासिक अहवाल जिल्हा कार्यकारी समिती व जिल्हा साधन गटाच्या सभेस उपस्थित राहून सादर करणे.

५. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी प्राचार्य, डाएट व विषय साधन व्यक्ती यांना शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने आवश्यक असलेले मापदंड निश्चित करुन, त्याची कार्यपध्दती निश्चित करावी. व सदर शासन निर्णयातील आदेशांची त्वरीत अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले कार्यकारी आदेश महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई व विद्या परिषद, पुणे यांनी ३० दिवसांच्या आत निर्गमित करावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०८२११६४६०२६८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Phansekar Reena V

Digitally signed by Phansekar Reena V
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Phansekar Reena V
Date: 2014.08.21 16:42:52 +05'30'

**( री.वि.फणसेकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
५. मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
६. मा.मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव
७. सर्व विभागीय आयुक्त
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सर्व आयुक्त, महानगरपालिका.
१०.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११.संचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१२.संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
१३.संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४.राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१५.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६.शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७.संचालक, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे.

१८. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे.
१९.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
२०.सर्व विभागीय शिक्षण उप संचालक.
२१.सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/प्रौढ), जिल्हा परिषद
२२.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२३.प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सर्व जिल्हे.
२४.महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागूपर-१/२
२५.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२६.सर्व प्रशासन अधिकारी, नगर परिषद/कटक मंडळे.
२७.शिक्षण निरिक्षक (पश्चिम/दक्षिण/उत्तर), बृहन्मुबई.
२८. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण विभाग.
२९.निवडनस्ती (प्रशिक्षण)